# महाराष्ट्र स्नेह मंडळ इंडियाना
(MSMI)



# स्नेहफुलोरा

## शुभ दिवाळी

अंक ३
आश्विन शके १९४५, नोव्हेंबर २०२३

# अनुक्रमणिका

**Story (कथा)**
The Throw: आध्या पुरंदरे

**कविता संग्रह (Poem)**
दिवाळी पहाट: भक्ती वझे
प्रतीक्षा: अश्विनी कस्तुरे
माय मराठी: भक्ती वझे
माझे मन: अश्विनी कस्तुरे
MSMI २०२२-२०२३ वाटचाल: संज्योत देवळालीकर

**खाद्ययात्रा (Recipes)**
अखरोट बिस्किट्स/कुकीज: श्रद्धा गोडबोले

**कला विभाग (Art Corner)**
भरतकाम: वृंदा ठाकूरदेसाई

# Story
# (कथा)

## The Throw

I'm on the bleachers sweating after completing the 100 meters. I take a sip of my water as I cheer on my teammates. The stadium is covered with a mix of brown and some other colors. The reason I mentioned brown is because we're the New Britton Bulldogs. And here I am, lost in my own thoughts screaming random things at my poor, hardworking teammates. I bet that I will be embarrassed, looking at this memory in the future, also somewhat proud, I hope.

The speaker starts to ring, loud enough for the whole stadium to hear. After the loud and intense ring, I can hear a few words. "Last call to shot put." I jump of my chair just in time and rush to the area. Have I gone deaf? I muttered under my breath. Apparently, I have. I am the only person from my school in shot put. I can't believe I'm going against 23 girls who aren't even in my school or district.

I start to make my way and I see that everyone is already in a line. Everyone is looking at me. The one shrimp in a line full of wrestlers and bodybuilders who are 2 feet taller than me. Humph. His is gonna be a long wait.

I wait patiently and I see girls chucking the Heavy metal ball as far it can go. I see the referee planting flags where the girls threw it. That's far, I gulped. I watched silently. Praying tha I could even hold the iron thing. As one of the girls say something I'm not even listening to them. I look at them. "Helloo? it's your turn wimp."

And then I realize they are talking to me.

'Sorry..." I replied shamefully.

I wake up from my thoughts and start making my way up. The referee hands me the iron ball. I start to pick it up because the sweat is piling on my hand. I try again and pick it up. Oh no...Time to throw. I start to load my arm up. Stopping only a few times pausing to make sure I was doing it right.

My arms felt as noodles wobbling and squabbling one way and another. I'm internally screaming as I throw my first throw. A loud, embarrassing "Boo! This sucks!"

Comes from the crowd. I look a my throw. Far behind the others. I grab the second ball and look around. Everyone's once "Do you think she can beat us?" Looks turn into "That wimp doesn't stand a chance" look. I grasp the ball. Tight. I close my eyes. My worry slowly turns into determination as I take deep breaths. Suddenly my arms felt overpowered...Ready for anything! I load my arm up. More determined then ever to prove those looks wrong. I start to crank my hand up. A small, independent, smile appearing at the tips of my lips. "Hurry up, Loser."

I didn't even feel anything when she said that. I just started loosening my hand and starting. I close my eyes, breathe and throw.

A long silence. That what I remember. As I slowly open my eye. I see the crisp silver ball flying through the air. It lands far, far away from all the other girls thrown with a loud Thump. Then everything stops. Like someone jumped in a Time Machine and everything froze as they left. Even the loud fall wind stopped blowing. Did I do something wrong? A cheer. A single cheer. How can one cheer turn into a whole stadium full of cheers? I thought I'll never know. But now, I think I know determination, responsibility, and taking a chance on yourself when people don't believe in you. I look at my ball. Now turned into a flag at the very same spot. My hands feel a metallic touch of a trophy, my very own trophy. I feel it. I know. I understand it. I won....I stop a moment to let this feeling sink in. I love it. I think one last time about it. I won, myself, from my hands, from my body, from myself. I could have never been so proud.

**The end.**

आध्या पुरंदरे



# कविता संग्रह
# (Poem)

## दिवाळी पहाट

उजळल्या ज्योती
काळोखाच्या उरी
ज्योतिर्मय झाली
पहाट लाजरी

अनोखा सोहळा
अमृत वेळी
सूर्याचे स्वागत
करिती प्रकाशाच्या ओळी

तेजात विरली
अंधार काजळी
रंगांची मैफिल
क्षितिजाची रांगोळी

संतोषाचे सूर
मांगल्य भूपाळी
आलोक उत्सव
प्रभात वेगळी

लागो ज्ञानाचे दीप
विवेक झळाळी
सुख समाधानाची
होवो दिवाळी

भक्ती वझे

## प्रतीक्षा !

वाटुली पाहताना
शिणले माझे डोळे
एकुटी चालताना
थकली पाऊले ।।

आठवणींचे पिंपळपान
नक्षीचे ही झाले ओझे
विरे इंद्रधनुची कमान
आता उन्हाचे कवडसे ।।

तरी तुझ्या वाटेवर
अजून मन रेंगाळते
भरतीच्या वेळी किनाऱ्याला
लाटचिंब बिलगते ।।

अश्विनी कस्तुरे



---Internal Use---

## माय मराठी

विचारांना शब्द दिले
भावनेला रूप दिले
तुझ्याच क्षितिजावर आरूढ
काव्य कलेचे चंद्र दिले

मनोगताला आकार दिले
वाणीला चैतन्य दिले
शिवरायांच्या वंशजांना
व्यक्त होण्या स्वाभिमान दिले

विद्येला साज दिले
ग्रंथांना ओज दिले
ज्ञानोबाच्या ज्ञानगंगेला
अमृताचे सूर दिले

संतवाणीचे वरदान दिले
अध्यात्माचे वारसे दिले
माय मराठी ऋणी तुझे ग
श्वासांना अमुच्या अर्थ दिले

भक्ती वझे

# माझे मन !

मन कोरा कॅनवास
तू रंग
संथ पाणी मन
तू तरंग ।।
विणा माझे मन
तू झंकार
अबोलीचे झाड मन
तू हुंकार ।।
मन माझे देवघर
तू निरांजन
शाश्वताचा तू सुवास
मन चंदन ।।
मन माझे वृंदावन
तू घनश्याम
मी एक भक्त प्रवासी
तू चारीधाम। ।

अश्विनी कस्तुरे

## MSMI २०२२-२०२३ वाटचाल

बघता बघता वर्ष उलटले, आली निरोप घ्यायची वेळ,
पण असं कसं जाणार बरं, न सांगता, कसं घडलं सारं!
आम्ही चार चौघी मिळून, उचल्ला होता हा बिडा,
एमएसएमआयच्या नावाची व्हावी सगळी कडे चर्चा!

सगळ्यांना एकत्र आण्याचं, आणल आम्ही मनात,
व्हॉट्सएप ला ह्या कामात वापरायचा,ठरवलं त्याच क्षणात!
आम्ही चार, आणि आमचे "हे",असा, एमएसएमआय फॅमिली ग्रुप सुरु झाला,
बघता बघता आठ(८) वरून,३३०"+ चा आकडा गाठला!

मकर संक्रांतीच्या सणाचे,झाले उत्तम निमित्त,
देऊनि तिळगुळ हातात,केली एमएसएमआय फॅमिलीची, गोड सुरुवात!
नवशिखे होतो आम्ही चौघ,एक्सपीरियंस न्हवता जास्त,
पूर्वीच्या कमिटी मेंबर्स नी मात्र, त्यांच्या आधाराने, केले आम्हाला सशक्त!

संक्रांती नंतर आमच्या गाडीनी,पकडली अशी स्पीड,
घरच्या नी पन प्रत्येक वेळेला,पुरवली आमची नीड!
असेच दिवस सरता, मराठी नव वर्ष नी दिली दस्तक,
गुडी उभारु, सन साजरा करु, कशाला कोणाची हरकत,

मराठी अस्मितेचा गजर करत, साजरा केला गुडी पाडवा,
संक्रांतीच्या सेंचुरी नंतर, ३००+ चा आकडा गाठला!

लहान मुलांची कुझबुझ आईकुनी, झाली आमच्यात चर्चा,
आपली संस्कृती जपायची असेल, तर आलीच पाहिजे, आपली मातृभाषा,
आपल्या मुलांना, मराठी यायला हवं, मनी आमच्या ही भावना,
मराठी शाळेच्या स्थापनेनी, केली ह्याची प्रयोजना!

सोशल मीडिया च्या ह्या रणगणात,मराठी लेखन, वाचन, जपायचा कसा,
प्रश्न, आम्हाला असा हा पडला,
स्नेहफुलोरा च्या माध्यमातून,
हेच जोपासन्याचा, प्रयत्न केला!

एमएसएमआय परिवार, काळे चा आहे अथांगसागर
नृत्य, संगीत, वाद्य, रंगमंच, म्हणाल ते होतं इथे सादर,
सुर आणि ताळ ह्यांची अप्रतिम जुगलबंदी,
नेहेमी आपल्या समोर, जी सादर करते, ती आपलीच "स्वर इंडी"!



---Internal Use---

दिवस झाले मोठे, ठंडी गेली पळून,
स्प्रिंग आणि समर च्या येण्याने, मन आले भरून,
आउटडोर्स चा आनंद लुटावा, केला असा विचार,
फॅमिली पिकनिक च्या निमित्ताने, भरपूर केला धमाल!

गणरायाच्या आगमनाचा, एकच, झाला जल्लोष
ढोल ताशाच्या ठोक्याने, केलं सर्वांना मधहोष
बाप्पांच्या पालकीची, साकार केली ज्यांनी कल्पना,
ढोल ताशाच्या तालावर सर्वांना नाचवलं, ती आपलीच "इंडी गर्जना"!

प्रवास हा नव्हता सोपा, सगळ्यात मोठा प्रश्न?
काहीही करायचा म्हंटल, तर फंड्स आणायचे कुठण?
बॅलेन्स हा तेवढाच होता, मेम्बरशिप न्हवती घेतली,
टिकट्सच्या रेट वर पण, ठेवली होती एक लिमिट,
जे काही आहे त्यातच, करायचं होतं सगळं फिट,
अश्या वेळी मात्र, स्पॉन्सर्स नी येऊन, केले सगळं फिक्स!

गुडी पाडव्याच्या इव्हेंट नंतर,झाली आम्हाला ही जाण,
चार जणांना जमण्या सारखं आता, राहिलं" न्हवत, एमएसएमआय च काम!
मदतीसाठी हात माघीतले,आम्ही एक, दोन, तीन,
सहजच अशी बनली ना आमची,एक्सटेंडेड कमिटीची जोरदार टीम!

एक्सटेंडेड कमिटी सोबत,आणखीन  आली मनसा धाऊन,
कुठल्या ही वेळेला हजर राहु, वॉलंटिअर्स चा टॅग लाऊन!
मग काय सांगायचा तुम्हा,ससाज झालो आम्ही,
बेस्ट म्म बेस्ट काम करायच,ठरवलं मिळूनी सगळ्यानी!

एमएसएमआय परिवारानी प्रत्येक कार्यक्रमाला,दिला भर भरून प्रतिसाद,
तुम्हा सर्वांच, मनापासून सहभागी होणं,हिच, आमच्या कामाला दिलेली, तुमची दाद!
हात जोडून आपण सर्वांचे, आभार मांतो आम्ही,
एमएसएमआय २०२३ च्या कार्यान्ना, आता देऊ इथे विश्रांती!

पुन्हा भेटू, नव्या उत्साहाने,२०२४" साली,
ठेवूनी तिळगुळ एकमेकांच्या हाती,
जपूया आपुलकिच्या हया रेशीमगाठी!

संज्योत  देवळालीकर

# खाद्ययात्रा
## (Recipes)

# अखरोट बिस्किट्स/कुकीज

**साहित्य:**
१/२ कप साखर
१/२ कप अखरोट
१/४ कप तूप
१/२ कप गव्हाचे पीठ
१/४ कप मैदा
१ टी स्पून बेकिंग सोडा
१ टी स्पून वेलची पूड
१/४ कप दूध
चिमुटभर मीठ

**कृती:**
मिक्सर ग्राइंडरमध्ये १/२ कप साखर, १/४ कप अखरोट आणि वेलची पूड ची पावडर तयार करा.
एक मोठ्या वाडग्या मध्ये १/४ कप तूप फेटून घ्या आणि त्यात वर केलेली पावडर मिसळा.
पुन्हा २ ते ३ मिनिटे फेटून घ्या.
आता गव्हाचे पीठ, मैदा, बेकिंग सोडा, मीठ आणि अखरोटचे तुकडे टाका.
चमचे किंवा हाताने चांगलं मिसळा, थोडं थोडं दूध घालून मऊ पीठ तयार करा.
तुमच्या आवडीनुसार बिस्किटाचा आकार द्या त्याच्या वर थोडे अखरोट ठेवा आणि हलकंस दाबून घ्या.
ते २० मिनिटे रेफ्रिजरेटरमध्ये ठेवा आणि नंतर १५० °C वर ३० ते ३५ मिनिटे बेक करा.
तुमची अखरोट बिस्किट्स/कुकीज तयार आहेत.

श्रद्धा गोडबोले



---Internal Use---

# कला विभाग
# (Art Corner)




वृंदा ठाकूरदेसाई


स्नेहफुलोरा